| MHKO030090012025 | म.कौ.हिं.सं.का.अर्ज क्रं. ८२/२०२५ मधील निशाणी ५ वरील आदेश<br>सुप्रिया श्रीपाद पाटील, वगैरे<br>वि.<br>श्रीपाद लक्ष्मण पाटील |
|---|---|

## (पारित दिनांकः १७ सप्टेंबर, २०२५)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १८ खाली अंतरीम दादी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचा अर्ज,वि.प. यांचे म्हणणे व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार क्रमांक १ व वि.प. यांचा विवाह दिनांक १२/१२/२००९ रोजी हिंदू धर्म पध्दतीप्रमाणे झाला आहे. सदर विवाह संबंधातून त्यांना अर्जदार नं. २ व ३ ही मुले आहेत. अर्जदार या फेडरल बँकेत कारकुन म्हणून नोकरीस आहेत तर वि.प. हे स्मॉल फायनान्स बँक येथे क्लस्टर हेड म्हणून नोकरीस आहेत. सन २०१३–१४ मध्ये अर्जदार क्रमांक १ यांना वि.प. यांचे एका महीला सहकारी सोबत प्रेमसंबंध असल्याचे समजले. त्यानंतर वि.प. याने नोकरी बदलून दुसरीकडे नोकरी स्वीकारली. अर्जदार हयाच घरातील सर्व खर्च करत होत्या. तसेच घरातील सर्व कामे, दवाखाना, औषधोपचार, मुलांची शैक्षणीक फी वगैरे अर्जदार हयाच करत होत्या. वि.प. हे पगार कोठे खर्च करतात याबाबत काहीच सांगत नव्हते. वि.प. व अर्जदार यांचेमध्ये क्षुल्लक कारणावरुन वादावादी व भांडणे होत होती. वि.प. यांनी मुलांच्या समोर अनेकवेळा अर्जदार क्रमांक १ यांना मारहाण केली आहे. वि.प. हे गर्विष्ठ, रागीट व अतिआक्रमक व अविचारी स्वभावाचे आहेत. तसेच वि.प. हे मुलांच्या समोर अर्वाच्य भाषेत बोलत असत. सततच्या त्रासामुळे अर्जदार हया वि.प. यांचेपासून दिनांक ०६/०३/२०२५ रोजीपासून विभक्त् राहात आहेत. अर्जदार यांनी वि.प. विरुध्द इतरही तक्रारी त्यांच्या मूळ अर्जामध्ये केल्या आहेत त्यादेखील प्रस्तुत अर्जाचे कामी विचारात घेणेबाबत कथन केले आहे.

४. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार ही आधारविना राहात असल्याने वि.प. हा ती राहात असले ठिकाणी बळजबरीने दंगा करण्याची शक्यता आहे. तसेच मुलांना घरी अथवा शाळेत भेटण्याच्या नावाखाली त्रास देण्याची शक्यता आहे. मुलांना भेटण्याबाबत शिस्त असणेसाठी न्यायालयाकडून आदेश आवश्यक आहे. त्यामुळे विना आदेश वि.प. यांनी अर्जदार यांना राहते घरी/शाळेत व अन्य कोणत्याही ठिकाणी भेटण्यापासून प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार क्र. १ हया बँकेत नोकरी करत असून त्याठिकाणीही वि.प. हे त्रास देण्याची शक्यता आहे त्यामुळे त्याबाबत वि.प. यांना प्रतिबंधीत करणे आवश्यक आहे. तसेच अर्जदार यांचे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक १ व विप. यांचे फेडरल बँक शाखा कोल्हापूर येथे संयुक्त बचत खाते आहे. सदर खात्याचा वापर दोघांपैकी एक अशा प्रकारे ठेवण्यात आला आहे. सदर खाते न्यायालयाचे परवानगीशिवाय वापरण्यास वि.प. यांना प्रतिबंधीत करणेची विनंती अर्जदार यांनी केली आहे.

५. वि.प. यांनी निशाणी १८ कडे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध केला आहे. वि.प. यांचे असे कथन आहे की, अर्जातील मजकूर खोटा, बनावट व लबाडीचा आहे. वि.प. हे अर्जदारसोबत प्रेमाने व आपुलकीने संसार केला आहे. वि.प. यांनी कधीही मारहाण केलेली नाही. अर्जदार या अतिशय हट्टी व रागीट स्वभावाच्या आहेत. अर्जदार हया कोणत्याही संयुक्तीक कारणाशिवाय वि.प. यांचा त्याग करुन विभक्त राहात आहेत. वि.प. यांनी देखील अर्जदार क्रमांक २ व ३ यांचा चांगल्या पध्दतीने सांभाळ केला आहे तसेच करणेस तयार आहेत. फेडरल बँकेतील बचत खाते नं. १६५१०१०००३०३४५ हे संयुक्त खाते असून त्याचा वापर अर्जदार व वि.प. हे दोघे करतात. वि.प. यांना सदर खाते वापरणेस प्रतिबंद केल्यास त्याचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब वि.प. यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

६. अर्जदारतर्फे विधीज्ञ व वि.प. तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाची पाहणी केली/असता माझ्यापुढे खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत. मी त्यावरील निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही तिचे वि.प. यांच्यासोबत कौटुंबिक संबंध असल्याचे सिध्द करते काय ? | होय. |
| २. | अर्जदार ही त्यांच्यावर वि.प. याने कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द करते काय ? | होय. |
| ३. | अर्जदार हे अंतरिम संरक्षण आदेश व प्रतिबंद आदेश मिळण्यास पात्र आहेत काय ? | अंशतः होय. |
| ४. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला. |

**<u>– कारणमिमांसा –</u>**

**<u>मुद्दा क्र.१ बाबत –</u>**

**७.** सदरचा अर्ज हा उभयपक्षांचा साक्षीपुरावा सादर होण्यापूर्वीचा असल्याने अर्जदार हिला तिचे वि.प. सोबत कौटुंबिक संबंध आहेत व ती त्यांच्या हाती कौटुंबिक हिंसाचारास बळी पडली आहे या बाबी प्रथमदर्शनी सिध्द करणे गरजेचे असते. या अनुषंगाने दोन्ही पक्षांचे कथनांचा विचार केला असता त्यांच्यामध्ये कौटुंबिक संबंध असल्याची बाब वादग्रस्त नसल्याचे दिसून येते. कौटुंबिक संबंधाबाबत वाद नसलेने मी मुद्दा क्र.१ चे ***<u>निष्कर्ष होकारार्थी</u>*** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबत–</u>**

८. सदरचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाचे कलम १८ नुसार अंतरिम संरक्षण व इतर प्रतिबंधात्मक आदेश मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. अर्जदार हिचे असे कथन आहे की, वि.प. यांनी अर्जदारांची कोणत्याही प्रकारची व्यवस्था केलेली नाही अगर कोणतीही जबाबदारी स्वीकारली नसल्याने व त्यांना त्रास दिल्यामुळे त्या वि.प. यांच्यापासून विभक्त रहात आहेत.

**९.** दोन्ही पक्षांनी एकमेकांविरुध्द बरेच गंभीर आरोप केले असून निश्चितच त्यावर दोन्ही पक्षांचा साक्षपुरावा झाल्यानंतरच निर्णय देता येईल. या क्षणी केवळ हे पाहणे गरजेचे आहे की, अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते

किंवा नाही. या अनुषंगाने अभिलेखाची पाहणी केली असता अर्जदार क्रमांक हिने तीच्या अर्जामध्ये तिच्यावर शाब्दिक, भावनिक, आर्थिक व मानसिक हिंसाचार केल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदरचे कथन तीने शपथेवर केले आहे. भारतीय संस्कृतीमध्ये लग्नानंतर पत्नी हिच्या करिता तिचा पती व त्यांचा संसार हा सर्वस्वी मानला जातो. अशा परिस्थितीत कुठलीही स्त्री कुठल्याही सबळ कारणाशिवाय तिच्या पतीपासून वेगळी राहिल ही बाब पटणेजोगे नाही. अर्जदार हिने अर्जात तिच्यावर झालेल्या कौटुंबिक हिंसाचाराबाबत केलेली कथने प्रथमदर्शनी विश्वासार्ह वाटतात. त्यामुळे मी ***मुद्दा क्र.२ चे निष्कर्ष होकारार्थी*** देत आहे.

**मुद्दा क्र.३ बाबत–**

**१०.** अर्जदार हिने सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रामुख्याने कलम १८ प्रमाणे आदेश मिळणे विषयी विनंती केली आहे. अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन शपथेवर कथन केले आहे की, वि.प. हा ती राहात असलेल्या ठिकाणी, नोकरीच्या ठिकाणी येवून त्रास देण्याची शक्यता आहे. मुद्दा क्र.२ वर चर्चा करतेवेळी वि.प. याने अर्जदार हिचेवर कौटुंबिक हिंचासार केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे अर्जदार हिला तशी भिती वाटणे शक्य आहे. सबब वि.प. यांनी अर्जदार यांचा अर्जदार क्रमांक १ राहत असले ठिकाणी अगर अर्जदार क्रमांक १ चे नोकरीचे ठिकाणी जावून अगर कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करु नये असा प्रतिबंधात्मक अंतरीम संरक्षण आदेश देणे योग्य होईल.

१०. अर्जदार हिने असेही कथन केले आहे की, वि.प. हे अर्जदार क्रमांक २ व ३ यांना त्रास देण्याची शक्यता आहे. तथापी अर्जदार हिने केलेल्या कथनामध्ये वि.प. यांनी अर्जदार नं. २ व ३ यांना त्रास दिला आहे असे कथन केलेले नाही. अर्जदार क्रमांक २ व ३ ही वि.प. यांची मुले आहेत. त्यामुळे फक्त अर्जदार क्रमांक १ यांना तशी भीती वाटते या कारणामुळे वडील या नात्याने मुलांना म्हणजेच अर्जदार नं. २ व ३ यांना भेटू नये याबाबत प्रतिबंधीत आदेश देणे योग्य वाटत नाही. तसेच अर्जदार यांचे पुढे असे कथन आहे की, अर्जदार क्रमांक १ व वि.प. यांचे नांवे फेडरल बँक शाखा कोल्हापूर येथे १६५१०१०००३०३४५ या नंबरचे संयुक्त बचत खाते आहे. त्याबाबत वि.प. यांनी सदर खाते न्यायालयाचे परवानगीशिवाय वापरण्यास प्रतिबंद करण्यात बाबत विनंती केली आहे.

तथापी अर्जदार हिने सदर खात्याबाबत दोघांपैकी एक असा वापर ठेवण्यात आला आहे असे म्हटले आहे. यावरुन नक्की कोणाला सदर खाते वापरण्याचा अधिकारी आहे किंवा दोघांना आहे याबबात स्पष्टता दिसून येत नाही. तसेच सदर खातेवरील रक्कम किती आहे, कोणी जमा केली अगर त्यातील रक्कम वि.प. परस्पर उचलत आहे अगर वि.प. यांनी सदर बचत खात्याचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केला आहे किंवा कसे याबाबत कोणतेही स्पष्ट कथन केलेले नाही. तसेच सदर मागणीच्या अनुषंगाने अर्जदार हिच्याकडे अन्यही कायदेशीर सक्षम पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे त्याबाबत सदयस्थीला संयुक्त बचत बँकखात्याबाबत अर्जदार मागणी करत तसा प्रतिबंध आदेश पारीत करणे सदयस्थीला योग्य होणार नाही. सबब मी ***मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी*** देत आहे.

**मुद्दा क्रमांक ४ बाबत–**

**११.** मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्षास्तव अर्जदार यांना कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याचे कलम १८ नुसार अर्जदार यांच्या तक्रारी व मागीतलेल्या दादी यांचा विचार करता मी खालील आदेश पारित करित आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. वि.प. यांनी अर्जदार क्रमांक १ यांना कोणत्याही स्वरुपाचा कौटुंबिक हिंचासार करु नये.

३. आदेशाची प्रत अर्जदार व वि.प. यांना कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयातील कलम २४ नुसार विनामुल्य देण्यात यावी.

४. सदरच्या अर्जाच्या खर्चाबाबत आदेश अंतिम आदेशाच्यावेळी करण्यात येईल.

५. सदर आदेशाची प्रत संबंधीत पोलीस ठाणे व संरक्षण अधिकारी यांना पाठवावी.

Digitally signed by ARCHANA SUBHASH PANSARE
Date: 2025.09.18 18:45:28 +0530

दिनांक १७/०९/२०२५.
कोल्हापूर.

**अर्चना एस. पानसरे**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(कोर्ट क्र.५) कोल्हापूर.